

# डॉ. कृष्णा किरवले

अर्चना
माने

मला भूगोल विषयाची प्रचंड आवड होती... पुढे जाऊन या विषयात नेमके काय करायचे याची मला काही कल्पना नसली तरी या विषयातले खूप सारे शिक्षण मला घ्यावयाचे होते... मात्र मुलीचे करियर म्हणजे हायस्कूल टिचर असा चंग बांधलेल्या माझ्या घरच्यांनी बळेबळे बी. ए. च्या शेवटच्या वर्षात माझ्या गळ्यात मराठी विषय बांधला होता. खरेतर मला वाचनाची प्रचंड आवड होती मात्र मराठी विषयात शिक्षण घ्यावे अशी माझी मुळीच इच्छा नव्हती. परिणामी माझा शिक्षणातला रस उडून गेला होता... या पार्श्वभूमीवर माझ्या कॉलेजमधला तो एक दिवस माझ्या आयुष्याला कलाटणी देऊन गेला...

खरेतर कधी कधी मला काहीतरी सुचायचे मग त्या कवितेच्या काही ओळी असायच्या तर कधी परिच्छेद... आणि मग मी ते लिहून ठेवायची. मात्र या ओळी इतरांना वाचून दाखविण्याइतपत माझ्यात धाडस नव्हते... किंवा मग मला तशी काही जाणच नव्हती हे जास्त खरे. एके दिवशी आमच्या राजश्री छत्रपती शाहू महाविद्यालयात आमच्या मराठी विभागाचा सांस्कृतिक कार्यक्रम होता. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख असलेली कोणीतरी डॉ. कृष्णा किरवले नावाची साहित्यिक आणि विचारवंत व्यक्ती त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून येणार आहे एवढेच मला माहीत होते. खरे सांगायचे तर विद्यापीठ या संकल्पनेची मला खऱ्या अर्थाने काहीच माहिती नव्हती. बी.ए. झाले की बी. एड. करायचे... असा प्रस्थापित मार्ग माझ्यासमोर माझ्या घरच्यांनी आखून दिलेला होता. साहजिकच बी.एड.ची झापड माझ्या डोळ्यांना बांधलेली असल्यामुळे विद्यापीठ ही भानगड मला माहितच नव्हती...

आणि मग त्या कार्यक्रमात तो चमत्कार झाला... हो माझ्यासाठी तो एक चमत्कारच होता. कार्यक्रमात महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी

ईमेल : archuworld@gmail.com

आपल्या कविता सादर केल्या. एका मुलाची कविता वाचून झाली आणि मग त्या भरगच्च सभागृहात कविता सादर करण्यासाठी अचानक माझे नाव पुकारले गेले... मला काहीच कळेना... चुकून माझे नाव पुकारले गेले असावे असे मला वाटले. पण दुसऱ्यांदा माझे नाव पुकारल्या गेल्यावर मी प्रचंड घाबरले... भीतीने माझ्या डोळ्यासमोर अंधारी येवू लागली... माझी मैत्रीण स्मिताने मला उठून उभा राहण्यासाठी डिवचले. तसे माझ्या लक्षात आले की हा खोडसाळपणा स्मिताने केला आहे. मी नाईलाजाने उठून उभी राहिले... मला काहीच सुचत नव्हते... आणि मग स्मिताने जवळजवळ मला व्यासपीठाकडे ढकलले... आणि मग मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच व्यासपीठावर उभी होते... आणि माझी आई नावाची कविता म्हणून दाखवत होते...

अर्थात एका दमात मी माझी कविता म्हणून टाकली. खरेतर कविता म्हणत असताना माझ्यावर ओढावलेल्या त्या बाका प्रसंगामुळे माझे डोळे भरून आले होते... आवाज ओला झाला होता... माझे हातपाय थरथरत होते... मला जवळजवळ रडूच कोसळले होते... आणि मग कवितेला खूप टाळ्या मिळाल्या. बराच वेळ टाळ्यांनी तो हॉल भरून गेला होता.

नंतर डॉ. किरवले सरांचे अध्यक्षीय भाषण होते. मी मात्र गोंधळून माईकजवळ तशीच उभी राहिले होते. ते व्यासपीठावरून उठले आणि माझ्याजवळ आले त्यांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि मला जागेवर जावून बसायला सांगितले. आणि मग आपल्या भाषणात त्यांनी माझ्या कवितेची केलेली स्तुती... तिचा अलगतपणे उलगडून सांगितलेला भावबंद... मला शब्दांची असलेली जाण... त्यासाठी त्यांनी माझे केलेले कौतुक... खरे सांगायचे तर मला स्वःतालाच माझ्या कवितेची नव्याने ओळख झाली होती... समोर डॉ. किरवले सर माझ्या कवितेबाबत जे काही सांगत आहेत... त्या अर्थी मी जे काही लिहिले आहे ते खरच काहीतरी वेगळे आहे की काय असे मला वाटू लागले. आणि त्यामुळेच माझ्या सारख्या ग्रामीण भागात वाढलेल्या सामान्य मुलीच्या आयुष्याला ही बाब मोठी कलाटणी देणारी ठरली. भले मला मराठी विषयात करीयर घडवायचे नव्हते....माझा आवडता विषय भूगोल होता...पण माझा पिंड साहित्याचा आहे याची सर्वात प्रथम जाणीव मला त्या दिवशी झाली ती सरांमुळेच! आणि मग मला वेगळा दुष्टीकोन मिळाला... मराठी विषयाकडे... साहित्याकडे इतकेच नव्हे तर माझ्या स्व:कडे पाहण्याचासुद्धा!!

आणि त्यामुळेच पुढे बी.ए. झाल्यावर मी घरी बंड पुकारले... बी.एड. करणे नाकारले.... आणि विद्यापीठात मराठी विभागात एम.ए.साठी प्रवेश घेतला... आणि त्यानंतर सर तुम्ही दोन वर्ष माझे विभागप्रमुख होतात. आम्हाला मराठी वृत्तपत्रांचा इतिहास शिकवीत होतात... असेच कधीतरी मी जेव्हा तुम्हाला हे सर्व सांगितले तेव्हा तुम्ही हसलात आणि म्हणालात; हो मला माहीत होते... तू घाबरली होतीस... पण त्याही स्थितीत तू तुझी कविता संपूर्णपणे म्हणून दाखविलीस... कारण तुझ्या कवितेतले सांगणे खरे होते... तुझ्या अंतकरणाचा तो आवाज होता... आणि तो तुला व्यक्त करायचाच होता... कोणत्याही परिस्थितीत आपले अंतकरण व्यक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही... आणि म्हणूनच अशा व्यक्तीचे साहित्यसुद्धा तेवढेच जिवंत असते... अस्वस्थ सगळेच असतात... मात्र हे अस्वस्थपण व्यक्त करण्याची माध्यम मात्र प्रत्येकाची वेगवेगळी असतात... तुझं व्यक्त होण्याचे मध्यम तुझं साहित्य आहे... या माध्यमाला घट्ट पकडून ठेव म्हणजे तू कधीच एकटी पडणार नाहीस... आणि सर्वात महत्वाचे मराठी विषयाचे शिक्षण घेतलेली व्यक्तीच साहित्याची अभ्यासक किंवा निर्मिती करणारी असते असे मुळीच नाही... तुला भूगोल आवडतो ना मग तू आता सुद्धा भूगोल विषयात करीयर करू शकतेस... साहित्याची प्रतिभा ही उपजत असते... त्याच्यासाठी तुला

**(पान ६६ वर)**

**वाटसरू / युनिक पुस्तके मिळण्याचे ठिकाण**

**डिस्काउंट बुक शॉप**
विजया बेकरी बसस्टॉपसमोर,
विद्यापीठ रोड, कोल्हापूर
संपर्क : संजय चिपरे,
भ्र. ७७४४८०१५०९

संशोधनामुळे पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाला नवी दिशा मिळाली. मार्क्सवादी सिद्धांत वापरून त्यांनी केलेले भारतीय कृषक् आंदोलनांवरील संशोधन आजही अकादमिक अध्ययनातील मैलाचा दगड मानलं जातं.

मला विद्यार्थीदशेपासून त्यांचं मार्गदर्शन लाभलं– जवळजवळ ३० वर्षं. त्यांच्यामुळे मला भारतीय समाजशास्त्राचा मौखिक इतिहास जाणून घेता आलाच पण त्यासोबत जागतिक समाजशास्त्राचा पटही उलगडला. हाडाचा शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. गेल्या ३० वर्षात त्यांच्याकडून. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या संशोधनातील शिस्त व व्यासंगाशी तडजोड न करता त्यांनी घडवल्या. भारतभर त्यांचे विद्यार्थी पसरलेले आहेत आणि त्यांच्या व्यासंगी संशोधनाचा वारसा पुढे चालवत आहेत. वरवर करड्या शिस्तीचे वाटणारे सर जवळच्या विद्यार्थांना मात्र कायमच त्यांचं स्नेहशील, अगत्यशील वडीलधारी व्यक्ती असे रूप अनुभवाला येत असे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून केलेल्या कार्यातून उच्च शिक्षणाविषयीची त्यांची व्यापक मतं त्यांनी पुस्तक रूपानं सूत्रबद्ध केली. भारतीय समाजशास्त्राला त्यांनी संस्थात्मक योगदान दिलं. मराठी समाजशास्त्र परिषदेचं अध्यक्षपद, भारतीय समाजशास्त्र परिषदेचं अध्यक्षपद या पदांचा सन्मान यांनी वाढवला.

सामाजिक आंदोलनांचं समाजशास्त्र, समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती, कुळांच्या व छोट्या शेतकऱ्यांच्या चळवळी, पर्यावरणऱ्हास, विकासाचा विपरित अर्थ यावर ते सातत्याने लिहित राहिले. अलीकडे त्यांचं दीर्घकालीन संशोधनावर आधारित 'शरद जोशी व शेतकरी संघटना' यावरील पुस्तक खूप गाजलं.

गेल्या वीस वर्षांत मी त्यांच्या तीन दीर्घ मुलाखती घेतल्या. एक पुणे आकाशवाणी केंद्रासाठी, दुसरी पुणे दूरदर्शनसाठी अशा जाहीर मुलाखती आणि तिसरी हिंदीतील 'समीक्षा' नियतकालिकासाठी. त्यानिमित्तानं वारंवार संवाद झाला. कटकमध्ये त्यांना भारतीय समाजशास्त्र परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला, त्यावेळी जगन्नाथ पुरी, कोणार्क असा प्रवास आम्ही काहींनी त्यांच्यासोबत केला, त्या संस्मरणीय आठवणी आहेत. तसाच लाल बसने एम. ए.च्या दुसऱ्या वर्षात असताना आम्हा निवडक विद्यार्थांना घेऊन सरांनी माळशिरसला मासूम संस्थेचं काम दाखवायला विद्यापीठीय निधीची वाट न बघता स्वखर्चानं नेलं होतं, तेही आठवतं.

आमची माणूस म्हणून, स्वतंत्र व्यक्ती म्हणून आणि समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून जडणघडण करणाऱ्या आमच्या व्यासंगी सरांना विनम्र आदरांजली!! ●

---

**(अर्चना माने / ६४ वरून)**

मराठीच्या डिग्रीची आवश्यकता नाही...

सर माझी भूगोलाची आवड आजही कायम आहे... त्या विषयातल मी खूप काही वाचत असते... आणि तरीही मी एम.ए.नंतर पत्रकारितेची मास्टर डिग्री घेतली... कारण मला माझा पिंड समजला होता. हो सर माझं व्यक्त होण्याचे माध्यम मी घट्ट पकडून ठेवले म्हणूनच आज मी या दुनियेत तग धरू शकले... मी मला ओळखू शकले... आणि मला जिवंत ही ठेवू शकले... अन्यथा या जगाच्या दुनियादारीत कुठल्या कुठे पाचोळ्यासारखी उडून गेले असते!!

सर माझ्या थरथरत्या आवाजात मी सांगितलेल्या नुसत्या कवितेतून तुम्ही माझ्यासारख्या सामान्य मुलीची पारख केली होती... आणि पुढच्या दोन वर्षात माझ्या लेखनाच्या जडणघडणीला योग्य दिशा दिली होती... स्मिताने माझ्या माघारी कविता वाचनासाठी माझे नाव नोंदविले नसते... तुम्ही मला आपल्या भाषणातून माझ्या कवितेची नव्याने ओळख करून दिली नसती... तो दिवस जर माझ्या आयुष्यात उजाडला नसता... तर... सर विचारही करवत नाही मला...

सर काल तुम्ही गेलात... रात्री फार उशिरा समजली मला ती वाईट बातमी... अशा पद्धतीनं तुमचं जाणं... एखादे दुस्वप्न वाटतयं... विश्वासच बसत नाहीये....खूप अस्वस्थ व्हायला झालंय सर... बरेच दिवस झाले सर... तुम्हाला एक गोष्ट सांगायची होती...खूप साधी होती... पण का कुणास ठावूक मला सांगताच आली नाही... आणि ती अशा पद्धतीने सांगावी लागेल असेही कधी वाटले नाही... सर... सर मला थँक्यू म्हणायचे होते... थँक्यू म्हणायचे होते सर तुम्हाला... ●